# पनवेल शहराला सामाजिक कार्याचा वारसा

- आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल(प्रतिनिधी) पनवेल शहराच्या विकासासाठी अनेक संस्था संघटनाचे योगदान असून शहराला सामाजिक कार्याचा वारसा लाभला असल्याचे येथे लोकोपयोगी कार्य करणाऱ्या विविध संस्थांच्या माध्यमातून नेहमीच दिसून येते असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथे केले.

शहरातील याकुब बेग हायस्कुल येथे युनानी ओपन कम्युनिटी या संस्थेच्या वतीने रविवार (१५) मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले यावेळी मार्गदर्शन करताना ते पुढे म्हणाले की, युवकांनी एकत्र येवून समाजाला मदत करण्याच्या हेतुने युनानी ओपन कम्युनिटी या संस्थेच्यावतीने आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या संस्थेच्या युवकांनी केलेला हा स्तुत्य उपक्रम म्हणजेच खऱ्या अर्थाने समाजसेवा आहे. असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांनी म्हटले की अस्वच्छतेमुळे रोगराई पसरते जर आपल्या परिसराची स्वच्छता झाली तर आजार कमी होतील. यासाठी तरूणांनी पुढाकार घ्यावा युनानी ओपन कम्युनिटी या संस्थेच्या कार्यास आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू असे आश्वासन मुल्ला यांनी दिले. शिबिराचे आयोजक अराफत पटेल तसेच जेष्ठ नेते युसुफ मुल्ला यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

शिबिरास कॉग्रसचे प्रवक्ते माजी नगरसेवक सिराज सय्यद, चेअरमन इब्राहीम मेटकर, आहम मुल्ला, राफीक धतुरे, अतिक खोत, मुश्ताक ढेपे, डॉ.शरिक जाफर, डॉ.जफर शेख, डॉ.रब्बाना अर्झबेगी, डॉ.सर्फराज अधिकारी, डॉ.अब्दुल्ला काझी, डॉ.अमिना कच्छी, रेहाना अर्झबेगी, मरियम अर्झबेगी, दानिश खान आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरात डोळे तपासणी, मधुमेह, रक्तगट, दंतचिकीत्सा, बॉडी मास तसेच सर्वसाधारण रूग्णांची तपासणी करण्यात आली.